# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.10.2024** **वारःसोमवार**

---

1. मराठी भाषा अधिक समृद्ध आणि प्रगल्भ करण्यासाठी आणखी जोमानं काम करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
2. संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त देशभरात संविधान गौरव अभियान
3. महिलांच्या टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाचा भारतावर विजय आणि
4. धुळे आणि बुलढाणा जिल्ह्यात धरणांमधून विसर्ग, नागरिकांना सावधानतेचा इशारा

**<u>मराठीभवन</u>**

मराठी भाषा अधिक समृद्ध आणि प्रगल्भ करण्यासाठी आणखी जोमानं काम करूया, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. मुंबईत उभारल्या जाणाऱ्या मराठी भाषा भवनाचं काल भूमीपूजन करताना ते बोलत होते. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी उभारलं जाणारं मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

मुंबईतल्या विविध प्रकल्पांचं आणि विकास कामांचं भूमीपूजन तसंच लोकार्पणही यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं.

**<u>मुख्यमंत्री</u>**

राज्य रस्ते विकास महामंडळ सुमारे दोन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प राज्यात राबवत असून, पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या निर्मितीत महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे; असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सांगितलं. नवी मुंबईत वाशी इथं शीव-पनवेल महामार्गावर ठाणे खाडी पुलाच्या एका मार्गिकेचं लोकार्पण तसंच रेवस-रेडी सागरी महामार्गावरच्या 7 खाडी पुलांच्या कामांचं भूमीपूजन करताना ते बोलत होते.

**<u>मुख्यमंत्री-लाडकी बहीण-नांदेड</u>**

राज्य शासनानं लाडकी बहीण योजनेसाठी 33 हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून, त्यातील 17 हजार कोटी रुपये बहिणींच्या खात्यात पोहोचले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नांदेड इथं महिला सक्षमीकरण अभियान मेळाव्यात दिली. लाडकी बहिण योजनेच्या दीड हजार रुपये रकमेचं विरोधकांना महत्त्व नसलं, तरी एका सामान्य कुटुंबातील महिलेला वर्षाला मिळणाऱ्या 18 हजार रुपयांचं महत्त्व आहे. ही योजना कायम सुरू राहील, असा शब्द देत असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. शासन आपल्या दारी योजनेचा लाभ आतापर्यंत 5 कोटी नागरिकांना झाला आहे असल्याचं त्यांनी सांगितलं.

**फडणवीस**

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा-गोरेगाव मतदार संघातली, 75 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याची ग्वाही, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. धापेवाडा उपसा सिंचन योजनेअंतर्गत, पाच हजार 217 कोटी रुपयांच्या विकास कामांचं तसंच, या भागातील विविध विकास कामांचं भूमीपूजन करताना फडणवीस बोलत होते. सरकारनं आजवर सर्वाधिक निधी सिंचनासाठी उपलब्ध करून दिला असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना वीज पंपाचं बिल माफ केल्याचं सांगून शेतकऱ्यांना दिवसा देखील मोफत वीज पुरविण्यासाठी, सौर कृषी वीज वाहिनी कंपनी तयार केल्याचं फडणवीस म्हणाले.

**रिजीजू**

26 नोव्हेंबर रोजी संविधानाला 75 वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्तानं केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन उभारण्यात येणार असल्याचं रिजीजू म्हणाले. संविधानात बदल करण्यात येणार असा अपप्रचार काही घटकांकडून होत आहे, या अपप्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन रिजीजू यांनी केलं.

**जाजू**

माहिती प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत विविध विभागांनी केंद्र सरकारच्या योजना चांगल्या रीतीनं जनसामान्यांपर्यंत पोहोचवल्या पाहिजेत, अशा सूचना माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी काल नागपूर इथं दिल्या. नागपूर आकाशवाणी केंद्रात माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या विविध कार्यालय प्रमुख आणि अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. संजय जाजू यांनी आकाशवाणीतील स्टुडिओ तसंच परिसराची पाहणी केली. स्वच्छता अभियान, एक पेड मा के नाम या उपक्रमात देखील माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या विभागांनी सक्रीय सहभाग नोंदवल्याचं त्यांनी सांगितलं.

**रब्बी पेरणी**

राज्यात रबी हंगामातील पिकांचं सरासरी क्षेत्र सुमारे 54 लाख हेक्टर असून,  गेल्या वर्षीच्या रबी हंगामापेक्षा यावर्षी सुमारे अडीच लाख हेक्टरनं अधिक म्हणजे 61 लाख हेक्टरवर रब्बीचा पेरा होईल, असा अंदाज कृषी आयुक्तालयातील उपसंचालक धनंजय कोंढाळकर यांनी व्यक्त केला आहे. राज्यात यावर्षी साडे 12 लाख क्विंटल बियाणं पुरवठ्याचं नियोजन असून, गरजेपेक्षा दोन लाख क्विंटल अतिरिक्त बियाणं उपलब्ध करुन देण्यात आलं आहे. आतापर्यंत 54 हजार 740 क्विंटल बियाणांचा पुरवठा करण्यात आला आहे अशी माहिती कोंढाळकर यांनी दिली.

**सुंदर शाळा**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत विभाग स्तरावर अ आणि ब वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी शाळा गटात पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या टिळक पथावरील न्यू इंग्लिश स्कूलला प्रथम क्रमांकाचं 21 लाख रुपयांचं पारितोषिक जाहीर झालं आहे. नागपूरमधील सरस्वती विद्यालयाला द्वितीय तर

पुण्यातीलच शिवाजी मराठा हायस्कूलला तृतीय क्रमांकाचं पारितोषिक जाहीर झालं आहे. शासकीय गट विभागात पुण्यातील पीएमसी स्कूल विनी 16 या शाळेला प्रथम, नाशिकमधल्या एनएमसी स्कूल क्रमांक 18 या शाळेला द्वितीय; आणि पुण्यातील पीएमसी स्कूल विनी 1 या शाळेला तृतीय क्रमांकाचं पारितोषिक जाहीर झालं आहे.

**<u>संमेलन-सोलापूर</u>**

सोलापूर इथं 20 ऑक्टोबरला पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं असून, त्याच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार रविंद्र चिंचोलकर यांची, तर उद्घाटक म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. एक दिवसीय संमेलनात विविध कार्यक्रम तसंच राज्यस्तरीय पत्रकार पुरस्कार वितरण आदि कार्यक्रम होणार आहेत.

**<u>बाबा सिद्दिकी</u>**

माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या पार्थिव देहावर काल मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अनेक राजकीय नेते आणि चित्रपट क्षेत्रातील लोकांनी सिद्दिकी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना आदरांजली वाहिली. मुंबईतील न्यायालयानं सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणातील हरियाणाचा गुरमेल सिंग याला 21 ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. धर्मराज कश्यप हा आरोपी अल्पवयीन असल्याच्या दावा झाल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्याचा आदेश न्यायालयानं दिला आहे. तिसऱ्या आरोपीची ओळख पटवली असून त्याला लवकरच अटक करण्यात येईल असं मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं सांगितलं. याच प्रकरणी पोलिसांनी प्रवीण लोणकर याला पुण्यातून अटक केली आहे. अधिक तपशिलाची प्रतीक्षा आहे.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला T20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, शारजाह इथं काल रात्री झालेल्या अ गटाच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा नऊ धावांनी पराभव केला. 152 धावांचा पाठलाग करताना भारतानं वीस षटकांत नऊ बाद 142 धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरनं नाबाद 54 तर दीप्ती शर्मानं 29 धावा केल्या. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियानं 20 षटकांत आठ गडी गमावून 151 धावा केल्या.

**<u>हवामान</u>**

धुळे जिल्ह्यात काल रात्री 8 नंतर मुसळधार पाऊस पडला. त्यामुळं निम्न पांझरा अक्कलपाडा प्रकल्पातून पाणी सोडण्यात आलं. पांझरा नदीकाठच्या तसंच धुळे शहरातील नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी असं पाटबंधारे विभागाद्वारे करण्यात आलं आहे.

बुलढाणा जिल्ह्यातही अनेक जलसाठ्यांमधून पाण्याचा विसर्ग सुरु असल्यानं नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात जोराचे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.**